



MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात



| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -४५ | शुक्रवार दि.०१ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -45 | FRIDAY DT.01 NOVEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |




संपादकीय

# चलबिचल जनता, चिंतातुर पुढारी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला अवघे २० दिवस उरले असून, निवडणुकीचे वातावरण अद्यापही दिसून येत नसल्याची घटना पहिल्यांदाच घडत असून, विशेषत: मराठवाड्यातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. जनता मतदान कोणाला करायचे आहे यासाठी सर्वच चिंतेत दिसून येत आहे. सर्वच नागरिक दबक्या आवाजात चर्चा करताना दिसत आहे. ना महाविकास आघाडी, ना महायुती त्यांच्या मध्ये यांचे उमेदवार सुधा मनसोक्त पणे प्रचारासाठी उत्तेजित दिसून येत नाही. निवडणुकीच्या या चिंतेच्या वातावरणात तो सक्षम आणि पात्र उमेदवार निवडून येत असल्याचा दावा करू शकतो का? असे वातावरण जनतेच्या डोळ्यासमोर निर्माण झाले आहे. सर्वच पक्षाचे उमेदवार चिंतेत आहे. असे वातावरण त्यांच्या विजयाची ग्वाही देऊ शकते का? तर अशा धकाधकीच्या काळात उमेदवारांना अधिक त्रास होऊ शकतो, विशेषत: मराठवाड्यात मात्र जरांगे पाटील यांचे विशेष दडपण दिसून येत आहे. मौलाना सज्जाद नौमानी साहब आणि जरांगे पाटील साहेबांना एकत्र येऊन निवडणुकीचे बिगुल फुंकले. आणि दलित सुधा यांच्या बरोबरीने येत आहे. या तिघांनी एकत्र येऊन एका नव्या राजकारणाला जन्म दिला तर हे प्रस्तापिताच्या विरोधात असेल. जर बीड जिल्ह्याचे वातावरण तपासले असता, महाविकास आघाडी आणि महायुती या उमेदवारांव्यतिरिक्त अपक्ष उमेदवारांचीही ताकद मानली जात आहे. या निवडणुकीत तीन उमेदवार कमकुवत होताना दिसत आहेत एकाच कुटुंबातील तीन व्यक्ती एकमेकांशी भांडताना दिसत आहेत. आणि त्यांच्या कुटुंबाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. तर त्या व्यतिरिक्त एक जरांगे पाटील उमेदवार लढताना दिसत आहे. एकाच कुटुंबातील अनेक सदस्य बीडच्या जनतेच्या सेवेसाठी प्रयत्न करत असल्याचे दिसत आहे. या निवडणूक मध्ये कधी बाप-मुलगी, कधी काका, पुतण्या, कधी मामा - भाचा आता तर हद्दच झाली आहे की, पती-पत्नीची भांडणे घराच्या भिंतीत असणारी आता निवडणूकीत रंगणार आहे. विजय कोणाचा असेल हे तर देवच जाणे. देवाच्या नजरेत कोण यशस्वी होईल, हे फक्त वेळच सांगेल आणि आपल्याला २३ नोव्हेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल.

# उमेदवार आणि मतदारसंघ तीन तारखेला जाहीर करणार : जरांगे

**प्रतिनिधी ।** आंतरवाली सराटी

आम्ही उमेदवारीवर भांडणार नाही. आम्ही सगळ्यांना मोकळे सोडणार आहोत. पण आम्हाला त्रास देणाऱ्यांना मात्र सोडणार नाही असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला. येत्या तीन तारखेला उमेदवार आणि मतदारसंघ जाहीर करणार असल्याची घोषणा जरांगे यांनी केली. ज्यांनी ज्यांनी फॉर्म भरला त्यातील एकच राहील, बाकीच्यांनी फॉर्म काढायचे आहेत असेही जरांगे पाटील म्हणाले. आज मनोज जरांगे पाटील यांनी सज्जाद नोमांनी, आनंदराज आंबेडकर यांच्यासह संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते. मराठ्यांनी इथून पुढे आझाद म्हणून जगाव असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. मायक्रो ओबीसींना, शेतकऱ्यांना तुम्ही काय दिलं ? असा सवालही जरांगे पाटील यांनी केला. आता परिवर्तन होणार आहे. आम्हाला देवेंद्र तात्यांनी लै शिकवलं असे म्हणत जरांगे पाटील यांनी फडणवीसांना टोला लगावला. आम्ही लोकशाही मार्गाने चाललोय. कधी जात म्हणून मी बघणार नाही असेही ते म्हणाले. सध्या शेती मालाला दर नाही, दुधाला दर नाही असेही जरांगे म्हणाले.

आम्ही धोक्यात आहोत तर मग हे हिंदू का म्हणत नाहीत की गरीब मराठ्यांना आरक्षण द्या म्हणून असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.



एकमेकांच्या धर्मात हस्तक्षेप करणार नाही. मी कट्टर हिंदू आहे. आम्ही सत्ता परिवर्तन करणार आहोत असेही जरांगे पाटील म्हणाले. मराठा, मुस्लिम आणि दलित एकत्र आले असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आम्ही लोकशाही मार्गाने पुढे जात आहोत. कोणीही दादागिरी करणार नाही असेही म नोज जरांगे पाटील म्हणाले. जे नाव सांगेल त्यांनीच उमेदवारी ठेवायची, बाकीच्यांनी अर्ज काढून घ्यायचे असेही मनोज जरांगे म्हणाले. लोकशाही मार्दाने लढा, आपल्या जागा सगळ्या ठिकाणी निवडून येतील असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. आपला समाज राजकीय लोकांच्या गुंडगिरीतून बाहेर काढला असल्याचे जरांगे म्हणाले.तुम्ही मराठ्यांना, धनगरांना, मुस्लिमांना, दलितांना काय दिलं आहे असा सवालही जरांगे यांनी केला.



## आमराई बालेपीर येथील युवा नेते शेख सोहेल यांचा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर गटात प्रवेश

**प्रतिनिधी ।** बीड

आमराई बालेपीर येथील युवा नेते शेख सोहेल यांनी माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास ठेवून त्यांच्या गटात जाहीर प्रवेश केला आहे. शेख सोहेल यांच्या प्रवेशामुळे जयदत्त क्षीरसागर यांच्या गटाला स्थानिक तरुणाईचा जोरदार पाठिंबा मिळत असून गटाची ताकद अधिकच वाढली आहे. प्रवेश समारंभात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी शेख सोहेल यांचे स्वागत केले आणि गटात सामील झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या प्रसंगी अॅड. शेख खाजा, मुखीद लाला, अलीम खान, नवाज खान, सईद भाई आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले

, गेल्या पाच वर्षात विकासाचे तीन तेरा वाजले असून, अशा चुका यापुढे होऊ नयेत म्हणून तरुण वर्ग जात-पात-धर्म विसरून विकासासाठी एकत्र येत आहे. अनेक तरुण स्वतःहून आमच्या गटात सामील होत आहेत. याप्रसंगी शेख अमीर, शेरखान, शेख सोनू, गुड्डू चाऊस, मोसीन शेख आदींसह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले

## उमेदवारी माघार घेण्यासाठी स्वत: अर्ज सादर करा - निवडणूक अधिकारी गौरव इंगोले

**प्रतिनिधी ।** बीड

माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्दिष्ट उमेदवारांनी उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, तहसील कार्यालय, माजलगाव येथे सकाळी ९.४५ ते ५.४५ वाजता व दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत स्वत: हजर होऊन सादर करावेत. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२४ ते ०३ नोव्हेंबर २०२४ या तिन्ही दिवशी शासकीय सुटी असल्याने कार्यालयास उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करता येणार नाही. तसेच दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजेनंतर चिन्ह वाटप करण्याची सुरूवात होईल, चिन्ह वाटपाची प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसारच चिन्ह वाटप करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळवले आहे.



शेख निजाम यांची पुतणी तथा शेख अमर जैनुद्दीन यांच्या मुलीच्या लग्न समारंभास संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची विशेष भेट

# समीकरण जुळले मनोज जरांगेंची मोठी घोषणा

## जरांगे पाटील, मौलाना सज्जाद नोमानी साहब यांच्यासह अन्य धर्मगुरुंच्या बैठकीत झाला ऐतिहासिक निर्णय

**प्रतिनिधी ।** बीड

मराठा, दलित अन् मुस्लिम यांचे समीकरण जुळले आहे. आता सत्ता परिवर्तन होणार, अशी घोषणा मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी आज अंतरवाली सराटीत झालेल्या बैठकीनंतर केली. बैठकीस मुस्लिम, दलित समाजातील धर्मगुरू आणि नेत्यांची उपस्थिती होती. जरांगे यांच्या या निर्णयाने राज्याच्या राजरकरणाला कलाटणी मिळणार का ? अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

जरांगे पुढे म्हणाले, मतदारसंघात इच्छुकांनी अर्ज भरले आहेत. आता ३ तारखेला कोणत्या जागी कोणता उमेदवार हे ठरले जाईल. एक उमेदवार निवडला जाईल. इतरांनी अर्ज मागे घेत स्टार प्रचारक म्हणून काम करायचे असा निर्णय जरांगे यांनी जाहीर केला. मराठा समाजाला मी एकत्र केले आहे. आता मुस्लिम आणि दलित समाज देखील सोबत आला आहे.



यामुळे समीकरण जुळले आहे. आम्ही सोबत आल्याने बदल घडेल असा निर्धार जरांगे यांनी व्यक्त केला.

कोणत्याही एका उमेदवाराला पाठिंबा जाहीर करणार - मौलाना सज्जाद नोमानी

दोन दिवसांत आम्ही एक पत्र प्रकाशित करणार आहोत. त्यामध्ये मराठा समाजाच्या मागण्या असतील, मुस्लीम समाजाचे प्रश्न असतील किंवा दलित व इतर समाजाचे जे काही प्रश्न असतील त्या मुद्यांचा त्यात समावेश असेल. एक कॉमन मिनीमन प्रोग्राम ठरवला जाईल. जरांगे पाटलांसोबत जी काही चर्चा झाली आहे. त्यातून प्रत्येक विधानसभा मतदार संघात विचार विनिमय करून योग्य तो निर्णय घेतला जाणार असुन त्या निर्णयानुसार कोणत्याही एका उमेदवाराला सपोर्ट करण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे मौलाना सज्जाद नोमानी साहाब यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. हा निर्णय देशातील पहिला ऐतिहासिक निर्णय असेल असेही नोमानी साहाब यांनी सांगितले.


# सलामीवीरांसाठी सनरायझर्स हैदराबादने मोजले तब्बल ५१,००,००,००० कोटी रुपये

५ खेळाडूंना संघात ठेवले कायम!

आयपीएलमधील सर्व फँचायझींना आज म्हणजेच ३१ ऑक्टोबर पर्यंत संघात कायम ठेवणाऱ्या खेळाडूंची यादी बीसीसीआयकडे सादर करायची आहे. त्यामुळे अनेक संघानी आपली यादी बीसीसीआयला दिली आहे. याजरम्यान सनरायझर्स हैदराबादने पाच खेळाडूंना संघात कायम ठेवले आहे. सनरायझर्स हैदराबादने पाच खेळाडूंवर ७५ कोटी रुपये खर्च केले आहेत. त्यामुळे सनरायझर्स हैदराबाद उर्वरित ४५ कोटी रुपयांसह लिलावात उतरेल.

सनरायझर्स हैदराबादने हेनरिक क्लासेनला सर्वाधिक रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे. २३ कोटी रुपये देऊन सनरायझर्स हैदराबाद क्लासेनलासोबत ठेवणार आहे. कर्णधार पॅट कमिन्सला १८ कोटी रुपये देऊन कायम ठेवण्यात आले आहे. त्याचवेळी अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांना १४ कोटी रुपये देऊन कायम





ठेवण्यात आले आहे. पाचवा खेळाडू म्हणून नितीश रेड्डी याच्याशी करार झाला आहे. नितीश रेड्डीला ६ कोटी रुपये देऊन संघात कायम ठेवणार आहे. हैदराबाद संघ गेल्या वर्षी उपविजेता ठरला होता, त्यामुळे संघाने प्रमुख खेळाडूंना कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

सनरायझर्स हैदराबादने संघात कायम ठेवणाऱ्या खेळाडूंची यादी-

* हेनरिक क्लासेन- २३ कोटी रुपये
* पॅट कमिन्स- १८ कोटी रुपये
* अभिषेक शर्मा- १४ कोटी रुपये
* ट्रॅव्हिस हेड- १४ कोटी रुपये
* नितीशकुमार रेड्डी- ६ कोटी रुपये

अभिषेक शर्माला लॉटरी-

अभिषेक शर्मासाठी सनरायझर्स हैदराबादने १४ कोटी रुपये खर्च केले आहे. आयपीएल २०२४ च्या हंगामात अभिषेक शर्माने १६ सामन्यात ४८४ धावा केल्या होत्या. गेल्या हंगामात अभिषेक शर्मा सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडूही होता. त्याने आयपीएल २०२४ मध्ये एकूण ३६ षटकार मारले होते. खझङ २०२४ मध्ये खेळण्यासाठी अभिषेकला ६.५ कोटी रुपये मानधन मिळाले होते. आता त्याला १४ कोटी रुपयांमध्ये कायम ठेवल्याने अभिषेकच्या पगारात दुप्पट वाढ झाली आहे.

मेगा लिलावाआधी नवीन नियम जाहीर-

बीसीसीआय आणि आयपीएल गव्हर्निंग काऊंसिलने मेगा लिलावाआधी नवीन नियम जाहीर केले आहेत. यामध्ये आयपीएलमधील एक संघ जास्तीत जास्त ५ खेळाडूंना संघात कायम ठेवू शकतील. तर राईट टू मॅचचा वापर करुन आणखी एक खेळाडू संघात ठेवण्याची मुभा देण्यात आली आहे. आयपीएल २०२५ मधील एखाद्या संघाने ५ खेळाडूंना कायम केले, तर त्यांना तब्बल ७५ कोटी रुपये मोजावे लागणार आहे.

# बीडमध्ये ५५ वर्षीय इसमाचा खून

**घटनेनंतर पेठ बीड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट देवून तेथील सीसीटिव्ही फुटेज तपासले. त्यानंतर काही तासातच मुख्य आरोपीला इनामदार, सानप यांनी गजाआड केले.**

**प्रतिनिधी ।** बीड

शहरातील पेठ बीड भागात अज्ञातांनी डोक्यात चिरा घालून खून केल्याची घटना रात्री उशीरा उघडकीस आली. घटनास्थळी पेठ बीड पोलिसांनी धाव घेत पंचनामा केला. अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक माहिती अशी कि, शहरातील पेठ बीड भागात टपरीवरुन पुडी आण म्हणले असता पुडी न आणल्याने गुंड प्रवृत्तीच्या आरोपीने डोक्यात चिरा घालून खून केला.

ही घटना शहरातील पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर



सुभाष कॉलनी येथे घडली आहे. घटनास्थळी पोलीस उपाधीक्षक विश्वांभर गोल्डे यांनी भेट दिली. सध्या सर्वत्र दिवाळीची धामधूम सुरू असून, सर्वत्र दिवाळीचा उत्साह आणि आनंद साजरा केला जात आहे. या आनंदाच्या क्षणाला बीडमध्ये खूनाच्या घटनेने गालबोट लागले आहे. चंद्रकांत आश्रुबा जाधव (वय ५५ वर्ष) रा. पेठ बीड असे मयताचे नाव आहे. रात्री १२:४५ वाजण्याच्या सुमारास अज्ञात आरोपीने डोक्यात चिरा घालून खून केल्याची घटना घडली आहे. हा प्रकार सकाळी उघडकीस येताच शहरात खळबळ उडाली आहे.

# मग तुझी उमेदवारी कशी शिरसागर यांच्या पक्षप्रवेश व भेटीगाठी जोरादार सुरू

बीड ।प्रतिनिधी

महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांचे बैठकांसह प्रवेश सोहळ्याचे सत्र सुरूच आहे. त्यांच्या बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून ठिकठिकाणी उमेदवारी मिळाल्याबद्दल स्वागत केले जात आहे. त्यांनी माजी आमदार जनार्दन तुपे यांचे आशिर्वाद घेतले.



बीड तालुक्यातील नागझरी येथील ज्योतीराम नैराळे, विष्णू नैराळे, अशोक नैराळे, अभिषेक नैराळे, संग्राम नैराळे, सुनिल नैराळे, संतोष नैराळे, मधुकर नैराळे, समाधान नैराळे, रोहन नैराळे, श्रीराम नैराळे आदी युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे साहेबांच्या विचाराने प्रेरित होवून डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी सर्व युवकांचे स्वागत करत पुढील वाटचालीसाठी व पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, बीड शहरातील पंचशील नगर परिसरात इंजि.अक्षय तरकसे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी स्थानिकांशी संवाद साधला. याप्रसंगी नगरसेवक गणेश वाघमारे, जनार्धन वडमारे,गणेश जोगदंड, विजय विद्यागर, रमेश जानवे, आनंद धनवे, अक्षय तरकसे, अमर गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक शहरसचिव अशोक जावळे, मिलिंद वडमारे, अजय सुरवसे, सुमेध सरवदे, अजय गायकवाड, अमित वाघमारे, धनंजय काकडे, स्तवन घुले, निखिल भोले, संकेत पवार, भैय्या जावळे, मयंक जाधव, प्रतिक इनकर, सुजित ससाणे यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**माजी आमदार जनार्दन तुपे यांनी दिले आशीर्वाद**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी आ.जनार्दन (तात्या) तुपे यांच्या निवासस्थानी भेट देत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद घेतले. याप्रसंगी तात्यांनी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून मोठ्या मताधिक्याने विधानसभेत पाठवू असे आश्वस्त केले.

# श्री संताजी महाराजांच्या नावाने नवीन सभागृह बांधून देणार धनंजय मुंडे यांचा तेली समाजाला शब्द

## परळीची निवडणूक मी विकासाच्या मुद्द्यावर लढतोय, शनी मंदिराच्या उर्वरित बांधकामाचेही काम मीच करणार – मुंडेंचा शब्द

परळी ।प्रतिनिधी

परळी शहरांमध्ये विविध समाजातील लोक आनंदाने व एकोप्याने राहतात. विविध, सण उत्सव महापुरुषांची जयंती पुण्यतिथी यासारखे कार्यक्रम घेण्यासाठी प्रत्येक समाजाला स्वतःचे स्वतंत्र सभागृह देण्याचा मी आजवर प्रयत्न केला आहे. तेली समाजाला सुद्धा श्री संताजी महाराजांच्या नावाने सर्व सोयी युक्त असे सभागृह बांधून देणार असल्याचा शब्द धनंजय मुंडे यांनी तेली समाजाच्या सोबत आयोजित बैठकीमध्ये दिला आहे.

परळीकरांना मागील निवडणुकीत दिलेले सर्वच्या सर्व शब्द पूर्ण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यातून अनेक विकास कामे झाली आहेत तसेच अनेक विकास कामे प्रगतीपथावर असून काही कामांना प्रशासकीय मान्यता मिळून निधी सुद्धा प्राप्त झालेला आहे. त्यामुळे कुणी कितीही आरोप करून मला एकटे पाडण्याचा किंवा घेरण्याचा प्रयत्न केला तरी मी परळीची निवडणूक




ही विकासाच्या मुद्द्यावर लढत आहे, शनी मंदिराचे उर्वरित बांधकाम देखील मीच पूर्ण करणार आहे असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.

परळी शहरात तेली समाजाच्या प्रतिनिधी व नागरिकांच्या समवेत धनंजय मुंडे यांनी स्वतंत्र बैठकीद्वारे हा संवाद साधला. यावेळी दांडिया महोत्सव व इतर सामाजिक उपक्रम आयोजित करणाऱ्या तेली समाजातील तरुणांचे धनंजय मुंडे यांनी कौतुक केले. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, संगमेश्वर फुटके, चंद्रकांत उदगीरकर, आयुब खान पठाण, सुरेश आण्णा टाक, चेतन सौंदळे, ड मंजीत सुगरे, कुमार व्यवहारे, दत्ताभाऊ सावंत, के डी उपाडे, प्रा. विनोद जगतकर, सूर्यकांत व्यवहारे, गुरुलिंग आप्पा पिंपळे, पांडुरंग अप्पा कोल्हे, शिवशंकर व्यवहारे, रामकीशन साखरे, तुळशीदास सालमोटे, डॉ.बावरे साहेब, पवन फुटके, प्रा.मधुकर शिंदे, अशोक बेंडे, छगन क्षीरसागर, मारुती अन्नपूर्णे, शंकर साखरे, राजाभाऊ शिंदे यांसह आदी उपस्थित होते.

# फारूक पटेल यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपला मतदान करून मुस्लिम समाजाच्या पाठीत खंजीर खुपसला कुंदन काळे

## जिकडे स्वार्थ तिकडे फारूक पटेल विचारधारेच आणि मुस्लिम समाजाच यांना काहीही घेणं देणं नाही

विधानसभा निवडणूक २०२४ महाराष्ट्रा सह बीड जिल्ह्यामध्ये प्रचार यंत्रणा जोर घेत आहेत आजपर्यंत ज्या फारूक पटेल यांना क्षिरसागर कुटुंबाने सर्वस्व दिलं कोणतीही पात्रता नसताना नगरसेवक पदापासून उपनगराध्यक्ष पदापर्यंत सर्व वैभव मिळवून दिल पक्षाचा पार्टीचा आणि स्वतःच्या विचारधारेचा समाजाचा कोणताही विचार न करता जाती आणि धर्माच्या पार्टीसोबत आरोप पटेल साहेब स्वतःच्या स्वार्थासाठी निघून गेले आणि आज वर्तमानपत्र सोशल मीडियाच्या माध्यमातून मुस्लिम समाजाने लोकसभा निवडणुकीत भाजपला मतदान केलं आहे भाजपच्या कमळ चिन्हाला मी मतदान केलं आहे त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाला बीडची जागा मिळावी म्हणून आवाहन करत आहेत मागणी करत आहेत मात्र भारतीय जनता पार्टीने सातत्याने मुस्लिम समाजाविषयी माझ्या मुस्लिम बांधवांविषयी सातत्याने अतिशय खालच्या दर्जाची भूमिका घेतली आहे नको ते वक्तव्य भाजपचे आमदार आशिष शेलार आमदार नितेश राणे नारायण राणे यासह भाजपचे वरिष्ठ नेते सातत्याने मुस्लिम समाजाला या देशात राहण्याचा अधिकार नाही मुस्लिम समाजाला या देशातून हद्दपार केला पाहिजे मुस्लिम समाजा दहशतवादी आणि अतिरेकी असल्याची वागणूक या भाजप आमदार मंत्र्यांकडून दिले जाते यावर फारूक पटेल साहेब एक शब्द बोलायला तयार नाहीत स्वतःच्या स्वार्थासाठी मात्र आम्ही भाजपला मतदान केले आहे विधानसभेला आम्हाला मतदान करा आम्हाला उमेदवारी द्या आम्हाला निवडून द्या असा आवाहन करत आहेत त्यामुळे माझी मुस्लिम बांधवांना भगिनींना विनंती आहे जाती आणि धर्मात मतभेद लावून दंगली घडवणाऱ्या भाजप सारख्या जातीवादी पार्टी सोबत असलेल्या फारूक पटेल यांना आपण



जाब विचारला पाहिजे गेले अनेक निवडणुकींमध्ये नगरसेवक म्हणून आपण त्यांना निवडून दिलं उपनगराध्यक्ष पदापर्यंत मानसन्मान दिला सत्तेतील सर्व मलिदा स्वतः घेतला समाजाशी इमानदारी करण्याची वेळ आली तेव्हा भाजप सारख्या जातीवादी पार्टीला त्यांनी मतदान करून स्वतःचा स्वार्थ साधला आणि आता परत विधानसभेमध्ये संधी मागत आहेत त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत २० तारखेला मतदान करत असताना मुस्लिम समाजाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या फारूक पटेल सारख्या स्वार्थी लोकांपासून मुस्लिम समाजाने दूरच राहिले पाहिजे कोणत्या पक्षाला मतदान केलं आणि कोणत्या पक्षाचा प्रचार केला हेही मुस्लिम समाजाने त्यांना मत मागायला आल्यानंतर विचारावे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षिरसागर यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेत्यांवर टीकाटिपणी करणाऱ्यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस जशास तसे उत्तर देईल चा इशारा राष्ट्रवादी विद्यार्थी मराठवाडा अध्यक्ष कुंदन काळे यांनी दिला आहे.

# मतदारसंघातील दहशत संपवण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात– माजी आ.भीमराव धोंडे

## प्रचाराचा नारळ फोडण्यासाठी ६ तारखेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा–माजी आ. भीमराव धोंडे

**प्रतिनिधी ।** आष्टी

गेल्या अनेक वर्षापासून मतदार संघातील गोरगरिबांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे. तरी वाढत चाललेली दहशत संपवण्यासाठी यावेळी अपक्ष उमेदवार म्हणून मी निवडणुकीच्या रिंगणात उतरलो मला सहकार्य करा असे आवाहन माजी आ. भीमराव धोंडे यांनी धानोरा येथे केले . पिंपळा, दौलावडगाव गट आणि धानोरा पं. स.गणातील बुथ प्रमुख आणि कार्यकर्ते बैठकीत धानोरा येथे बोलत होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती कुमार बांदल होते .

यावेळी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे, माजी सभापती साहेबराव म्हस्के, मुकादम मुरलीधर लगड,अभयराजे धोंडे,राजाराम ननावरे,पांडुरंग गावडे,नरहरी तागड, बाबासाहेब जाधव,रंगनाथ बोडखे, माजी सरपंच संजय कवडे, संजय धायगुडे, झुंबर चव्हाण,फारुकभाई, तुकाराम चव्हाण, बाळासाहेब शेकडे,बबन ननावरे,धुळाजी लकडे सह आदी जन उपस्थित होते .

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, लोकांच्या आग्रहास्तव विधानसभा निवडणुकीत अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला . पहिल्या टप्प्यात मी आमदार असताना मतदारसंघात एक हजार पाझर तलाव केले . रस्ते करुन ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालये सुरू केले. संस्थेत सर्व जाती धर्माचे लोक नोकरीला असून , मतदारसंघातील दहशत संपवण्यासाठी आपल्याला निवडणुक जिंकायचीच आहे. त्याकरीता सर्वांनी माझ्यापाठीमागे उभे रहा. लोकशाही मार्गाने दहशत संपत असते .

मागच्या निवडणुकीत मला फसविले गेले . मतदारसंघातील अनेक गावांत जल जिवन योजनेचे काम बोगस झाले असून , शासनाच्या पैशाचा मोठ्या अपव्यय झाला . आष्टी येथे



६ तारखेला प्रचाराचा नारळ फोडण्यात येणार असून , या कार्यक्रमाला मतदारसंघातील पुरुष व महिलांनी प्रचंड संख्येने उपस्थित रहावे ऐतिहासिक अशी सभा होणार आहे . माजी सभापती साहेबराव म्हस्के यांनी सांगितले की, या भागाला कुकडीचे पाणी मिळावे यासाठी माजी आ.भीमराव धोंडे हे मुंबईला पायी गेले . लोणी गटात २०१४ पुर्वी रस्ते अत्यंत खराब होते. भीमराव धोंडे आमदार झाल्यानंतर सर्वच रस्ते चांगल्या दर्जाचे केले . त्या ५ वर्षांत मतदारसंघात रस्त्यांचे जाळे निर्माण केले . धानोरा गावांतून खऱ्या अर्थाने मा.आ.भीमराव धोंडे यांच्या राजकारणाची सुरुवात झाली . ही निवडणूक कार्यकर्त्यांच्या अस्तित्वाची लढाई असून , मला जि.प. निवडणुकीत फसविले, साहेबांना गेल्या निवडणुकीत फसविले होते . या निवडणुकीत बुथ प्रमुख व कार्यकर्त्यांनी जागरूक राहून काम करावे . धुळाजी लकडे यांनी सांगितले की, माजी आ. भीमराव धोंडे हे आमदार झाल्यानंतर मतदार संघाला शांतता मिळणार . . उपसरपंच चांगदेव एकशिंगे यांनी सांगितले की, माजी आ. भीमराव धोंडे हे शांत, संयमी नेते असून , ते अपक्ष उमेदवार आहेत हे चांगले झाले . फळांची अपेक्षा न करता काम करीत राहिल्यास लाभ आपोआप मिळतो . मी गेल्या १४ महिन्यापासून मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सोबत काम करीत आहे . त्या कामाचा गावांसाठी चांगला फायदा झाला. कोणाचाही दबाव आला तरी आपण उमेदवारी मागे घ्यायची नाही अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली . अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, मतदारसंघाला विकासासाठी माजी आ. भीमराव धोंडे साहेबांची गरज असून , साहेब सर्वांसाठी काम करतात. मतदारसंघातील गोरगरिबांच्या मुलामुलींना शिक्षण मिळावे यासाठी शाळा महाविद्यालये सुरू केले . विधानसभा सदस्य असताना पाझर तलाव व रस्ते करुन विकास केला . बुथ प्रमुखांनी आपापल्या गावात प्रचाराचे व मतदान करुन घेण्याचे व्यवस्थीत नियोजन करावे . याप्रसंगी पांडुरंग गावडे , युवराज खटके, सरपंच संजय विधाते, माजी उपसरपंच भगवान काळे, अरुण क्षेत्रे, योगेश विधाते, माजी पं. स. सदस्य संजय धायगुडे, सरपंच भरत जाधव, भरत काळे, कुमार तागड, राधाकीसन सिरसाट, अमोल खटके, माजी सरपंच संजय नालकोल, महादेव पांढरे,कैलास वायभासे आदींची भाषणे झाली . कार्यक्रमास सरपंच तात्यासाहेब नालकोल, सरपंच सावता ससाणे, जि. प. सदस्य सुरेश माळी,उपसभापती नामदेव धोंडे, नानाभाऊ वाडेकर, दत्तोबा शेळके , महेंद्र फुलमाळी,अनिल गायकवाड, सरपंच सोमीनाध गायकवाड, सौरभ दिघे, आवेज सय्यद, दिगंबर मेहेत्रे, म्हातारदेव शेकडे, चेअरमन पांडुरंग धोंडे, माजी सरपंच संजय नालकोल, भाऊसाहेब देसाई, बाबुराव कदम,बाबासाहेब एकशिंगे, भिकाजी दातीर, अशो

# अवैध बेकायदेशीर होल्डिंग ( बॅनर) व्यवसाय तात्काळ बंद करण्याची मागणी

**प्रतिनिधी ।** जिंतुर

शहरातील विनापरवाना व्यवसाय करणारे होल्डिंग बॅनर परवानगी नसताना बेकायदेशीर रित्या संबंधित अधिकारी कर्मचारी यांना हाताशी धरून सदरचा कारभार चालत असून ते तात्काळ बंद करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे मुना लक्ष्मीकांत टाले सामाजिक कार्यकर्ता यांनी केली आहे

शहरातील नगर परिषद हद्दीतील काही नागरिक परवाना नसताना होल्डिंग बॅनर बनविण्याचे काम कारखाना चालवत आहे नंतर होल्डिंग बॅनर रस्त्यावर नगर परिषद ची कोणती परवानगी न घेता व बेकायदेशीपणे पावती न घेता अनाधिकृत रित्या लावत आहेत या सर्व कारभाराला शासकीय अधिकारी कर्मचारी यांचा पाठबळ असून सदर प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याची मागणीचे निवेदन मुख्याधिकारी नगरपरिषद व तहसीलदार यांना दिले आहे.



# देवणी तालुक्यात सीमावर्ती असलेल्या चेक पोस्टवर पोलीस प्रशासनाची करडी नजर

**प्रतिनिधी ।** देवणी

देवणी हा सीमावर्ती तालुका असून चार पाच कि.मी. अंतरावर महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमाआहेत आगामी १५ व्या विधानसभेसाठी यंदा महाराष्ट्रात निवडणुका होत आहेत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवर तोगरीमोड सह देवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अन्य ठिकाणी चेकपोस्ट नाके उभारले आहेत या नाक्यावर पोलीस प्रशासनातील कर्मचारी व बि. एस. एफ. दलातील जम्मू काश्मीर येथील जवान बंदोबस्तासाठी नियुक्त केले आहेत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या चेकपोस्टद्वारे निवडणुकीच्या दरम्यान वाहतुकीच्या माध्यमातून होणाऱ्या गैरप्रकारावर करडी नजर ठेवण्यात आली आहे त्या अनुसंघाने देवणी शहरातील उदगीर निलंगा रोडवर



बि.एस.एफ.दल जवानाच्या चोख बंदोबसतात पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांच्या मार्गदर्शना खाली वाहणाची झाडा- झाडती घेण्यात आली महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे तर २३ तारखेला मतमोजणी होणार आहे लागलीच नवीन सरकार अस्तित्वात येईल निवडणुकीसंदर्भात राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत आहे राजकीय पक्षाच्या उमेदवाराने प्रचारात आघाडी घेतली आहे या निवडणुका शांततेत कायदा व सुव्यवस्थेत पार पाडाव्या म्हणून पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे दीपावली साठी कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या सुट्टी मिळणार नाहीअसेही त्यानी कर्मचारी यांना स्पष्ट सांगितले आहे माणिकराव डोके हे पुणे मुबंई सारख्या ठिकाणी पोलीस प्रशासनात कर्तव्य बजावत असताना अनेक वेळा निवडणुकी संदर्भात चोख कामगिरी बजावली आहे पोलीस प्रशासनातील गाढा अभ्यास प्रचंड अनुभव असल्यामुळे कुठलाही बंदोबस्त माणिकराव डोके हे सहज हाताळतात कोणत्याही कायदा सुव्यवस्थेच्या बाबत कर्तव्य बजावत असताना डोके यांची सतर्कता दिसून येते दीपावली हा संस्कृतीक उत्सव असला तरी निवडणुका ह्या एक लोकशाहीचा उत्सव आहे लोकशाही सुरक्षित राहील तर देश व कायदा सुरक्षा आबादित राहील लोकशाहीच्या माध्यमातून होणाऱ्या निवडणूक उत्सवात भाग घ्या मतदान करा व कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला मदत करा असे आव्हान पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांनी केले आहे

# परळीतून जावयाला उमेदवारी मागे घ्यायला लावा, अन्यथा परिणाम....

## गंगाखेडचे उमेदवार रत्नाकर गुट्टे यांच्यावर समाज माध्यमांमधून दबाव!
## अनेक पोस्ट व्हायरल, काही मुंडे प्रेमींचे थेट रत्नाकर गुट्टे यांना मेसेज

गंगाखेड - सध्या भाजप व महायुतीचे गंगाखेड विधानसभेचे उमेदवार रत्नाकर गुट्टे समाज माध्यमांवर एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहेत. त्यांचे जावई असलेले राजाभाऊ फड यांनी परळीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या स्पर्धेत भरलेला अर्ज मागे घ्यायला लावा, अन्यथा त्याचा रोष रत्नाकर गुट्टे यांना गंगाखेड विधानसभा निवडणुकीत सहन करावा लागेल, अशा पद्धतीचा दबाव समाज माध्यमांवरून रत्नाकर गुट्टे यांच्यावर आणला जात आहे.

रत्नाकर गुट्टे यांचे जावई व त्यांच्या मर्जित असलेले राजाभाऊ फड यांनी परळी विधानसभेची शरद पवार गटाने उमेदवारी नाकारल्यानंतर अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. राजाभाऊ फड हे एकेकाळचे मुंडे प्रेमी व भाजप-रासपचे कार्यकर्ते होते. मात्र एकीकडे धनंजय मुंडे यांना मोठ्या नेत्यांकडून व्युहरचना करून टार्गेट केले जात असताना राजाभाऊ फड यांची उमेदवारी ही काही ओबीसी व त्यातल्या त्यात वंजारी समाजाच्या मतांचे विभाजन करणारी ठरू शकते.

त्यामुळेच परळीला लागूनच असलेल्या गंगाखेड मतदारसंघातील अनेक मुंडे प्रेमी सोशल मीडियावर पेटून उठले असून, त्यांनी रत्नाकर गुट्टे यांच्या वर दबाव आणायला सुरुवात केली आहे.

रत्नाकर गुट्टे यांना दिवंगत भाजप नेते गोपीनाथराव मुंडे व आ.पंकजाताई मुंडे यांचे कायम सहकार्य लाभल्याने ते तुरुंगात असताना सुद्धा मागच्या वेळी निवडून आले. गंगाखेड मतदारसंघात निर्णायक मतदान हे ओबीसी समाजाचे असून, येथून डॉ.मधुसूदन केंद्रे, रत्नाकर गुट्टे असे आमदार विजयी झाले ते मुंडे कुटुंबाला मानणाऱ्या मतदारांमुळे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. गंगाखेड मध्ये




मोठ्या प्रमाणावर मुंडे कुटुंबाला मानणारा वर्ग असून मुंडे कुटुंब म्हणतील त्याप्रमाणे इथल्या आमदारकीचे गणित ठरते, असेही मानले जाते.

'सन्माननीय रत्नाकर गुट्टे साहेब, आज पंकजाताई मुंडे यांच्या पराभवानंतर मुंडे कुटुंब राजकीय अडचणीत असताना तुमचे जावई राजाभाऊ फड हे मुंडे प्रेमींचे व्हिलन ठरून धनंजय मुंडे यांच्या विरोधात लढण्याचा हट्ट धरून बसले आहेत. त्यांना उमेदवारी मागे घ्यायला लावा, अन्यथा गंगाखेड मध्ये तुम्हाला आमच्या व ओबीसी समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, त्याचा फटका तुम्हाला मतपेटीतून दिसेल, त्यामुळे राजाभाऊ फड यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावा.' अशा आशयाचे मेसेज सोशल मीडियावर व्हायरल होत असून, बऱ्याच नेटिझन्सनी थेट रत्नाकर गुट्टे यांना सुद्धा हे मेसेज पाठवले आहेत. दरम्यान रत्नाकर गुट्टे आपल्या जावयाची समजूत काढणार की जावयासह स्वतः देखील वंजारी समाजाचे व मुंडे प्रेमींचे व्हिलन ठरणार? हा प्रश्न आता ऐरणीवर आला असून गुट्टे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बीड शहरातील पुजारी खून प्रकरणी पेठ बीड पोलीसानी आरोपीच्या मुसक्या आवळल्या

## पी आय अशोक मुदिराज याची उल्लेखनीय कामगिरी

गुरन.३४२/२४ कलम १०३(१),६१(२),१८९(२),१९१(२), १९१(३),१९०,११५(२),३५२,३५१ (२) बीएनएस सह ४/२५ भाहका

फिर्यादी निलेश भारत जाधव वय २८ वर्षे रा. सुभाष कॉलनी पेठ बीड

आरोपी १) विशाल संतोष वाघमारे २) शुभम संतोष वाघमारे ३) कार्तिक संतोष वाघमारे ४) विनोद विलास वाघामारे ५) संतोष वाघमारे ६) विकास वाघमारे ७) सुषमा संतोष वाघमारे ८) गणेश संतोष वाघमारे सर्व रा. सुभाष कॉलनी पेठ बीड गु.घता. वेळ ठिकाण दिनांक ३०/१०/२०२४ रोजी रात्री २०.०० ते दिनांक ३१/१०/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा. चे दरम्यान टकारी समाज मंदीराच्या वरांडयामध्ये इस्लामपुरा रोड सुभाष कॉलनी पेठ बीड येथे गु.दा. ता. वेळ दिनांक ३१/१०/२०२४ रोजी वा. ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा चुलता नामे चंद्रकांत आश्रुबा जाधव वय ५५ वर्षे यास यातील आरोपी यांनी हातात तलवार व काठ्या घेवून शिवीगाळ करुन मारहाण केली होती. त्यावेळी फिर्यादी याने त्याचे चुलत्याला भांडणे कशाममुळे झाली असे विचारले असता यातील मयत याने सांगीतले की, मंदीराचे पाठीमागील बाजुस राहणारे वरील लोक हे त्यांचे घरातुन मटणाचे हडक नेहमीच मंदीराच्या परीसरात फेकतात म्हणून मी त्यांना सांगायला गेलो त्यामुळे वरील लोकांनी मला मारले व तुला मारुनच टाकतो असे म्हणून धमकी देऊन मारहाण केली.त्यांच्या भांडणाची आम्ही सोडवासोडव केली त्यावेळी वरील सर्व लोक तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणून धमकी देवुन निघुन गेले. तेंव्हा



चुलते यांना मुक्का मार लागला होता. व ते पुन्हा नेहमीप्रमाणे मंदीरात जावुन थांबले होते.

दिनांक ३१/१०/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाचे सुमारास फिर्यादी व इतर लोकांना यातील मयत यास मंदीराच्या वरांडयामध्ये डोक्यात दगडाचा मोठा चिरा घालुन रक्ताच्या थारोळयात मरण पावलेला दिसला. त्यावेळी फिर्यादीचा भाऊ अमोल जाधव यास विकास वाघमारे व संतोष वाघमारे हे दोघे म्हणाले तुम्ही आमचे नादी लागु नका एकाचा काटा काढला आहे तुमच्याकडे पण बघतो असे म्हणून धमकी दिली होती. याच वरील लोकांनी माझे चुलते चंद्रकांत आश्रुबा जाधव वय ५५ वर्ष यांना मंदीराच्या परीसरात हाडके फेकू नका असे म्हणाल्याचे कारणावरुन त्याचा राग मनात धरुन दिनांक ३०/१०/२०२४ रोजी रात्री ०८.०० ते दिनांक ३१/१०/२०२४ रोजीचे सकाळी ०९.०० वा.चे दरम्यान कट रचुन डोक्यात मोठा दगडी चिरा घालुन खुन केला म्हणुन गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास सपोनि एस.डी. शिरसाट हे करीत आहेत.आरोपी अटक - मुख्य आरोपी विशाल संतोष वाघमारे यास अटक असून इतर आरोपी बाबत चौकशी करून पुढील कार्यवाही करत आहोत.


# गेवराई तालुक्यातील ट्रेनी शिक्षक मानधनापासून वंचित.!

## मानधन मिळाले नसल्याने ट्रेनी शिक्षकांमध्ये नाराजीचा सुर

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना कौशल्य विकास आणि कामगार मंत्रालयामार्फत मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना सुरू केली होती. या योजनेअंतर्गत राज्यातील सर्व शासकीय शाळांमध्ये ट्रेनी शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. मात्र दिवाळीत देखील गेवराई तालुक्यातील सुशिक्षीत बेरोजगार ट्रेनी शिक्षकांना पैसे मिळालेले नाहीत.**

काहींना फक्त सात दिवसांचेच पैसे मिळाले असल्याचे चित्र आहे. महायुती सरकारने निवडणुकींच्या अगोदर अनेक योजनांची घोषणा




केली होती. त्यामध्ये सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या ट्रेनी शिक्षक म्हणून नियुक्त्या करण्यात आल्या. लाडक्या बहिणींच्या खात्यावर पैसे जमा झाले मात्र गेवराई तालुक्यातील ट्रेनी शिक्षकांवर दिवाळी अंधारात साजरी करण्याची वेळ आली आहे. याविषयी अधिक माहितीसाठी तालुका गटशिक्षणाधिकारी यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे मानधन मिळाले नसल्याने ट्रेनी शिक्षकांमध्ये नाराजीचा सुर दिसून येत आहे.

# तीस मिनिटाच्या सभेला तीन कोटी रुपये खर्च निवृत्ती महाराज इंदुरीकर

आष्टी सुरेश कांबळे यांजकडून

सध्या महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीचे वारे जोरात वाहू लागले असून २८८ जागांसाठी २८ हजाराहून अधिक उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. या निवडणुकीचा खर्च हा वारेमाप होत असून त्याचा समाज सुधारण्यासाठी काही एक फायदा होत नाही. तीस मिनिटाच्या सभेला तीन कोटी रुपये खर्च सर्वच राजकीय पक्षाचे पुढारी करत असल्याची टीका ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी केली.




आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथील श्री संत बाळूदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यात कीर्तन प्रसंगी बोलत होते.पुढे बोलताना इंदुरीकर म्हणाले की,गावचा विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून सरपंचाला निवडून देतो मात्र अडीच-अडीच वर्षाच्या सरपंच पदाच्या निवडीमुळे गावचा विकास खुंटला आहे. सरपंच हा पूर्ण पाच वर्षे असावा. तरच गावचा विकास होऊ शकतो. वारकरी संप्रदाय हा मन शुद्ध असणारा वर्ग असून त्याला संसारात मोह,माया ही कधीच नसते. खरं बोलणारा व विद्वान माणसाचा आज समाजामध्ये कचरा झाला आहे. मी खरे बोलतो म्हणून मला गेल्या ३० वर्षापासून अनेक संकटाशी सामना करावा लागत आहे .मात्र मी कोणत्याही संकटाला घाबरलो नसून समाज सुधारण्याचे काम केले आहे. सध्या लोकांची एकमेकांची जिरवाजीरवी करण्यातच जिंदगी बरबाद होत असून या वायफाट गोष्टीकडे लक्ष देण्यापेक्षा आपल्या गावातील शाळेकडे लक्ष द्या. शाळेतील मोबाईल बंद करा आणि सीसीटीव्ही बसवा. मुलींनो पळून जाऊन आईबाप व भावाची मान खाली घालण्यापेक्षा आई बापाचे उच्च शिक्षण घेऊन नाव कमविण्यातच तुमची जिंदगी उज्वल होईल. रागावर नियंत्रण ठेवून काम केल्यास निश्चितच यश मिळेल. काम ,क्रोध व मोहा पायी वाटोळे झाले असून ४० टक्के विद्यार्थी हे आज मोबाईल मधील रमी खेळून भिकारी झाले आहेत. गावातील मंदिरा सोबत शाळा कशी सुधारेल यासाठी गाव पुढाऱ्यांनी लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. आज महाविद्यालयीन मुले कर्जाच्या खायीत अडकले आहेत त्याचे कारण म्हणजे मोबाईल वरील रमी व शेअर मार्केट या व्यसनाने जिंदगी बरबाद झाली असून यापुढे कसायाला गाई देण्यात इतकेच दारुड्या मुलाला मुलगी देण्याचे पाप आहे. हे अनेक उदाहरणासह त्यांनी पटवून दिले. यावेळी परिसरातील भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# तीस मिनिटाच्या सभेला तीन कोटी रुपये खर्च निवृत्ती महाराज इंदुरीकर

आष्टी सुरेश कांबळे यांजकडून

सध्या महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीचे वारे जोरात वाहू लागले असून २८८ जागांसाठी २८ हजाराहून अधिक उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. या निवडणुकीचा खर्च हा वारेमाप होत असून त्याचा समाज सुधारण्यासाठी काही एक फायदा होत नाही. तीस मिनिटाच्या सभेला तीन कोटी रुपये खर्च सर्वच राजकीय पक्षाचे पुढारी करत असल्याची टीका ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी केली.

आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथील श्री संत बाळूदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यात कीर्तन प्रसंगी बोलत होते.पुढे बोलताना इंदुरीकर म्हणाले की,गावचा विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून सरपंचाला निवडून देतो मात्र अडीच-अडीच वर्षाच्या सरपंच पदाच्या निवडीमुळे गावचा विकास खुंटला आहे. सरपंच हा पूर्ण पाच वर्षे असावा. तरच गावचा विकास होऊ शकतो. वारकरी संप्रदाय हा मन शुद्ध असणारा वर्ग असून त्याला संसारात मोह,माया ही कधीच नसते. खरं बोलणारा व विद्वान माणसाचा आज समाजामध्ये कचरा झाला आहे. मी खरे बोलतो म्हणून मला गेल्या ३० वर्षापासून अनेक संकटाशी सामना करावा लागत आहे .मात्र मी कोणत्याही संकटाला घाबरलो





नसून समाज सुधारण्याचे काम केले आहे. सध्या लोकांची एकमेकांची जिरवाजीरवी करण्यातच जिंदगी बरबाद होत असून या वायफाट गोष्टीकडे लक्ष देण्यापेक्षा आपल्या गावातील शाळेकडे लक्ष द्या. शाळेतील मोबाईल बंद करा आणि सीसीटीव्ही बसवा. मुलींनो पळून जाऊन आईबाप व भावाची मान खाली घालण्यापेक्षा आई बापाचे उच्च शिक्षण घेऊन नाव कमविण्यातच तुमची जिंदगी उज्वल होईल. रागावर नियंत्रण ठेवून काम केल्यास निश्चितच यश मिळेल. काम ,क्रोध व मोहा पायी वाटोळे झाले असून ४० टक्के विद्यार्थी हे आज मोबाईल मधील रमी खेळून भिकारी झाले आहेत. गावातील मंदिरा सोबत शाळा कशी सुधारेल यासाठी गाव पुढाऱ्यांनी लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. आज महाविद्यालयीन मुले कर्जाच्या खायीत अडकले आहेत त्याचे कारण म्हणजे मोबाईल वरील रमी व शेअर मार्केट या व्यसनाने जिंदगी बरबाद झाली असून यापुढे कसायाला गाई देण्यात इतकेच दारुड्या मुलाला मुलगी देण्याचे पाप आहे. हे अनेक उदाहरणासह त्यांनी पटवून दिले. यावेळी परिसरातील भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT